**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,**
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.
**ई -मेल**nssmantralaya@gmail.com **दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५**

क्रमांक: रासेयो-२०२५/प्र.क्र.४३/रासेयो कक्ष, दिनांक: ६ मे, २०२५

प्रति,

**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,**
**रासेयो संलग्नित**
**सर्व विद्यापीठे/संचालनालये**

**विषय:- दिनांक ७ मे, २०२५ रोजी प्रस्तावित असणा-या "नागरी संरक्षण मॉकड्रिल" मध्ये रासेयो स्वयंसेवकांच्या सहभागा बाबत....**

**संदर्भ**:- १) क्षेपणास्त्र क्रमांक-VIII-११०१२/०२/२०२२-DGCD(CD) भारत सरकार, गृह मंत्रालय यांचे दि. ५ मे २०२५ रोजीचे पत्र.

**महोदय**,

उपरोक्त विषयान्वये आपणांस असे सूचित करण्यात येते की संदर्भाधिन पत्रान्वये **"दिनांक ७ मे, २०२५ रोजी प्रस्तावित नागरी संरक्षण मॉकड्रिलचे"** आयोजन गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून करण्यात येणार असून, त्याअनुषंगाने आपण आपल्या विद्यापीठ/संचालनालये अधिनस्त महाविद्यालयांना याबाबत कळविण्यात यावे.

दिनांक ७ मे,२०२५ रोजी प्रस्तावित नागरी संरक्षण मॉकड्रिलच्या अमंलबजावणीस्तव आपण अतितात्काळ संबधित जिल्हयाचे मा. जिल्हाधिकारी तसेच मा. जिल्हा नागरी संरक्षण अधिकारी ( District Civil Defence Officer) यांच्याशी संपर्क करण्यात यावा. या कार्यात रासेयो स्वयंसेवक व विशेषत्वाने आपत्ती व्यवस्थपनाचे प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षित स्वयंसेवकांना तात्काळ नियुक्त करण्यात यावे. त्याचप्रमाणे जिल्हा प्रशासन व जिल्हा नागरी संरक्षण अधिकारी यांचेकडून मॉकड्रिल संदर्भात वेळोवेळी प्राप्त सूचनांचे प्रभावी अनुपालन करण्यात यावे.

**२.** सबब, याबाबत आपण आपल्यास्तरावरुन शिघ्र नियोजन करुन मॉकड्रिल मध्ये जास्तीत जास्त रासेयो स्वयंसेवकांचा सहभाग नोंदवावा. याबाबतचा सांख्यिकीय अहवाल/ माहिती राज्य संपर्क अधिकारी, रासेसो कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, व रासेयो क्षेत्रिय संचालक, पुणे यांना दिनांक १० मे, २०२५रोजी सादर करण्यात यावा.

**सोबत**:- भारत सरकार, गृह मंत्रालय यांचे दि. ५ मे २०२५ रोजीचे पत्र.

**(डॉ. निलेश पाठक)**
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी
महाराष्ट्र शासन